RNI No. MAHBIL /2009/40124

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ९, अंक १] सोमवार, फेब्रुवारी २७, २०२३/फाल्गुन ८, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

## असाधारण क्रमांक १

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी पुर:स्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. I OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१८८८ चा ३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका
१९४९ चा ५९. अधिनियम यांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

**१.** या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

## प्रकरण दोन

**मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ब) मध्ये, " पाच पालिका सदस्य " या मजकुराऐवजी, " दहा नामनिर्देशित पालिका सदस्य " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८८८ चा ३.

## प्रकरण तीन

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (ब) मध्ये, " पाच पेक्षा अधिक नसतील इतक्या " या मजकुराऐवजी, " निवडून आलेल्या पालिका सदस्यांच्या एकूण संख्येच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसतील इतक्या किंवा दहा, यापैकी जी कमी असेल इतक्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९४९ चा ५९.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा ३) याच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (१) मधील खंड (ब) मध्ये अशी तरतूद आहे की, पालिका प्रशासनातील विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेल्या पाच नामनिर्देशित पालिका-सदस्यांचा, महानगरपालिकेत समावेश असेल आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (२) मधील खंड (ब) मध्ये अशी तरतूद आहे की, पालिका प्रशासनातील विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेल्या पाच पेक्षा अधिक नसतील अशा संख्येतील नामनिर्देशित पलिका-सदस्यांचा प्रत्येक महानगरपालिकेत समावेश असेल.

**२.** पालिका प्रशासनातील ज्ञान व अनुभव असलेल्या व्यक्तीला, राज्यातील महानगरपालिकांच्या अधिक प्रभावी प्रशासनासाठी पालिका-सदस्य म्हणून नामनिर्देशित केले जाते. अशा प्रकारे नामनिर्देशित केलेल्या पालिका-सदस्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा वापर करून, महानगरपालिकांच्या कामकाजात गुणात्मक रीतीने सुधारणा करण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नामनिर्देशित पालिका-सदस्यांची संख्या पाच वरून दहा आणि राज्यातील इतर महानगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या पालिका-सदस्यांची संख्या पाच पेक्षा अधिक नसतील वरून एकूण संख्येच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसतील इतक्या किंवा दहा, यापैकी जी कमी असेल इतक्या पालिका-सदस्यांच्या संख्येत वाढ करणे इष्ट आहे असे शासनास वाटते. म्हणून, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५(१)(ब) आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५(२)(ब) यांमध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३.

**एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३.

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.